# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र. ५०२ दिनांक ०८/०६/२०२०

## कोवीड-१९ बाधीत पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेवर स्वतंत्र उपचार करणेकरिता मुंबई नंतर राज्यातील २ रे हॉस्पीटल पालघर जिल्हयात सुरु

कोवीड-१९ चा प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासन तसेच मा.जिल्हाधिकारी यांनी निर्गमित केलेल्या आदेशांची काटेकोर अमंलबजावणी करण्यासाठी पोलीसांच्या दैनदिन कामासह संपुर्ण जिल्हयाभरात नाकाबंदी, फिक्स पॉईट, पेट्रोलिंग करण्यात येत आहे. तसेच १० आंतरजिल्हा व १० आतंरराज्य चेकपोस्ट आणि मायग्रंट लेबर्स व वेळोवेळी येणा-या नैसर्गिक आपत्तीसाठी पोलीस मनुष्यबळ वापरण्यात येत आहे. पालघर जिल्हयासाठी स्वतंत्र कारागृह नाही. त्यामुळे न्यायालयीन कोठडीतील आरोपींना जिल्हयातील विविध पोलीस ठाण्यांच्या लॉकअप मध्ये ठेवण्यात आले आहे. त्यांच्या सुरक्षेसाठी पालघर जिल्हा पोलीस दलातील पोलीस अधिकारी व कर्मचरी तैनात करण्यात आलेले आहेत. सदर आरोपींपैकी काही हे कोरोना बाधीत मिळुन आलेले आहेत. त्या आरोपीमुंळे पालघर जिल्हयातील विविध पोलीस ठाणेतील काही पोलीस अधिकारी व कर्मचारी हे कोरोनाबाधीत आढळुन आले आहेत. तसेच संपुर्ण पालघर जिल्हयातील बरेच पोलीस अधिकारी पोलीस कर्मचारी कॉरंटाईन करण्यात आलेले आहेत. मुंबई येथे कलीना व मरोळ या ठिकाणी पोलीसांसाठी डेडीकेटेड कोवीड-१९ हॉस्पिटल तयार करण्यात आलेले असुन त्याच धर्तीवर पालघर पोलीस जिल्हा पोलीस दलातील सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना उच्च दर्जाच्या उपचारासोबत योग्य संतुलीत आहार मिळावा तसेच पोलीस कल्याण विषयक बाबीकंडे विशेष लक्ष देता यावे याकरिता जिल्हयातील सर्व कोरोना बाधीत पोलीस अधिकारी व कर्मचा-यांवर एका स्वतंत्र हॉस्पीटल मध्ये उपचार करणेबाबात पोलीस अधीक्षक, पालघर यांनी मा.जिल्हा अधिकारी, पालघर व जिल्हा चिकीत्सक, पालघर यांना विनंती केली होती. त्याअनुषंगाने मा.जिल्हा अधिकारी, पालघर यांनी तसेच आदेश निर्गमित केलेले आहेत. त्यानुसार जिल्हयाच्या मध्यवर्ती ठिकाणी आयडीयल मेडीकल कॉलेज, पोशेरे, ता.वाडा, जि. पालघर येथे ५० बेड असलेले सुसज्ज डेडीकेटेड कोवीड हेल्थ केअर सेंटर (D.C.H.C) व ५० बेड असलेल कोवीड केअर सेंटर (C.C.C) पालघर पोलीस दलाकरिता दिनांक ०५/०६/२०२० रोजी पासुन सुरवात करण्यात आलेले आहेत. पालघर जिल्हा पोलीस दल Fornt line Worker ही महत्वाची भुमिका **कोरोना वारीयर्स** म्हणुन निभावत आहे. याविशेष हॉस्पीटलमुळे पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांच्या आरोग्याची खबरदारी घेण्यात येईल.